साप्ताहिक
# न्यायस्वातंत्र्य समता
पत्रकारितेचे मूल्य जतन करणारे वृत्तपत्र...

संपादक : रमेश अ. शेळके     कार्यकारी संपादक : ॲड. चंद्रकांत गायकवाड

RNI NO.: MAHARAR/2010/36016
Website : nyayswatantryasamata.weebly.com

● वर्ष : ७ वे ● अंक : ७ वा ● सोमवार दि. २७ मार्च ते २ एप्रिल २०१७ ● पुणे ● पाने : ४ ● किंमत २ रुपये

NEWS वाचकांसाठी
अप्रकाशित साहित्य प्रकाशित केले जाईल.
व आपले लेख / बातम्या जाहिरातीसाठी
संपर्क साधा.
पत्ता : सिद्धीविनायक केशर बिल्डिंग, ३०५, तीसरा मजला,४३३/अ, सोमवार पेठ, पुणे - ४११ ०११
Mob.: 9561924323/8554891279
Email : remesh.shelke24@yahoo.com
Web : nyayswatantryasamta.weebly.com

# बाबासाहेबांच्या बंगल्याला १ कोटीचा निधी

## तळेगावात सुशोभीकरणाचे पाऊल : राज्य सरकारच्या सामाजिक व न्याय विभागाची तरतूद

**पिंपरी (प्रतिनिधी)** : देहुरोड येथील धम्मभूमी, तळेगाव दाभाडे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घर आणि क्रांतीवीर लहुजी वस्ताद यांच्या पुण्यातील संगमवाडी येथील समाधीच्या सुशोभीकरणासाठी एकूण साडेतीन कोटी रुपये निधी देण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. सामाजिक न्याय व विशेष विभागाचे अवर सचिव अ. को. आहिरे यांनी याबाबत अध्यादेश काढला आहे.

- ♦ देहुरोड धम्मभूमीला ५० लाख मिळणार
- ♦ धम्मभूमी, बंगला आणि संगमवाडीतील समाधी सुशोभीकरणाठी साडेतीन कोटींना मान्यता

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी २०१६ हे वर्ष समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून जाहीर केले आहे. याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित राज्यभरातील स्थळांचा विकास करण्याबरोबरच बौद्ध बांधवांच्या दृष्टीने ऐतिहासिक व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांचा विकास व सुशोभीकरणासाठी राज्य सरकारने १७० कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे. त्यापैकी २५ कोटी रुपये निधी या वास्तुंच्या विकासाबरोबरच सुशोभीकरणावर खर्च केला जाणार आहे. याकरिता अशा राज्यभरातील संस्था, नगरपालिकांकडून संबंधित वास्तू व परिसराचा



विकास करण्यासंदर्भात प्रस्ताव मागवले होते.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहरालगत मावळ तालुक्यातील देहुरोड येथे ऐतिहासिक बुद्ध विहार असून २५ डिसेंबर १९५४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते मंदिरात भगवान गौतम बुद्धांची मूर्ती बसवण्यात आली. त्यानंतर धम्मभूमी म्हणून हे विहार जगभरात प्रसिद्ध झाले आहे. आजही दरवर्षी याठिकाणी बौद्ध बांधव दर्शनासाठी २५ डिसेंबरला मोठी गर्दी करतात. देहुरोड येथे बौद्ध बांधवांची दिवसेंदिवस वाढ होत आहे. या स्थळाच्या परिसराचे सुशोभीकरण व नूतनीकरणासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

याशिवाय तळेगाव दाभाडे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध विद्यापीठ उभारण्यासाठी जमीन विकत घेतली होती. त्याठिकाणी त्यांनी बंगला बांधला होता. भारताच्या राज्य घटनेच्या अनेक परिशिष्टांचे लेखन देखील केले आहे. सध्या केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेली वास्तू आता शिल्लक राहिली आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्ध पुतळा, नागपूरच्या दीक्षाभूमीची प्रतिकृती व डॉ. आंबेडकर यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांची छायाचित्रे या वास्तूमध्ये पाहायला मिळतात. या वास्तूला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले असून वर्षभरात हजारो बौद्ध अनुयायी वास्तूला भेट देत असतात. बंगल्याची डागडुजी व सुशोभीकरणासाठी एक कोटी रुपयांच्या निधीला मान्यता मिळाली आहे.

दरम्यान, पारतंत्र्याच्या काळात इंग्रजांना सळो की पळो' करून सोडणाऱ्या क्रांतीवीर लहुजी साळवे यांची समाधी संगमवाडी येथे असून काही वर्षांपूर्वी एका बांधकाम व्यावसायिकाने या जागेवर कब्जा मिळवण्याचा प्रयत्न केला होता. आता हे ठिकाण नागरिकांच्या दृष्टीने महत्वाचे असून या ठिकाणी लहुजी साळवे यांचे स्मारक उभारण्यासाठी दोन कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

देहुरोड येथील बुद्ध विहाराच्या विकासासाठी आम्ही अर्धा एकर जागा संरक्षण खात्याकडून विकत घेतली आहे. या बुद्ध विहाराचा चार वर्षांपूर्वी ४ कोटी १९ लाख रुपयांचा विकास आराखडा राज्य सरकारला सादर केला आहे. मात्र, अद्यापही त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आता केवळ ५० लाखांची तरतूद हा सामाजिक न्याय विभागाचा भंपकपणा आहे.

# वाहतूक पोलिसांविरोधात फ्लेक्स लावल्याप्रकरणी ६ जणांना अटक

**पुणे (प्रतिनिधी)** : शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्यासह ६ जणांना वाहतूक पोलिसांविरोधात फ्लेक्स लावल्या प्रकरणी अटक करण्यात आली आहे.

संजय हरिश्चंद्र मोरे (वय ४४), अमीर इब्राहीम शेख (वय ३९), इम्रान दस्तगीर खान (वय ३४), अहमद ताहेरहुसेन खान (वय ३२), राहूल रमेश माने (वय १९) आणि अन्वर हबीब शेख (वय २०, सर्वजण रा. नाना पेठ), अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

वाहतूक पोलीस घोळक्याने चौकांमध्ये दंड वसुली करतात, अशा आशयाचे फ्लेक्स शहरात दोन दिवसांपूर्वी लावण्यात आली होते. अशा प्रकारचे फ्लेक्स लावून त्यामधून पोलिसांवर टीका केली होती.

दरम्यान, या प्लेक्समुळे



पोलिसांची चांगलीच धावपळ उडाली होती. पुणेकरांनी त्याचे कौतुकही केले होते. मात्र, या माध्यमातून वाहतूक पोलीसांवर सरळ टीका केल्याने वाहतूक पोलीस दुखावले होते.

विश्रामबाग पोलिसांनी फ्लेक्स काढले. त्यानंतर शहराचे विद्रुपीकरण केल्याच्याप्रकरणी अज्ञाताच्या विरोधात विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. प्रकरण वरिष्ठांपर्यंत गेले होते. फ्लेक्स लावणाऱ्यांचा शोध घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार पोलिसांनी सहाजणांस अटक केली आहे. त्यामध्ये शिवसेनेच्या पदाधिकाऱ्याचा समावेश आहे.

# लेखणी सुटली अन रायफल हाती आली : गाथा वीरपत्नीची



**पुणे (प्रतिनिधी)** : कुपवाडा जिल्ह्यातील दहशतवाद्यांशी लढताना वीरमरण आलेल्या संतोष महाडिक यांच्या पत्नी स्वाती महाडिक पतीच्या आठवणींसोबत राहण्यासाठी सैन्यदलात दाखल झाल्या. लहान मुलांना शिकवून त्यांना भावी पिढीचे आदर्श आणि देशाचे आधार बनवायचे हे ध्येय कायम मनात ठेवून शिक्षण क्षेत्राचा छंद जोपासला परंतु सैन्यदलातून देशसेवा करण्याचे संतोष महाडिक यांचे स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास उरी बाळगला असल्याचे स्वाती महाडिक यांनी सांगितले.

प्राथमिक शाळेतील शिक्षिका ते सैन्य दलातील अधिकारी पदापर्यंतची आपली शौर्याची कहाणी सांगताना जराही डगमगत नाहीत. हातातली लेखणी सुटली आणि साडेचार किलोची रायफल हातात आली.

साडेचार किलोची रायफल घेऊन सलग ४०-४० किलोमीटर पळताना जराही थकवा जाणवला नाही. कारण मनाला ज्या वेदना झाल्या आहेत त्यापुढे या शारीरिक वेदना काहीच नाहीत.

यामुळे आपल्या पतीच्या आठवणींसोबत राहण्याची आणि त्याचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी यानिमित्ताने मिळणार आहे. छोटीशी शाळा स्थापन करायची, मुलांना शिकवायचे आणि आनंदी राहायचे अशी आकाराने छोटी पण मोठा आनंद देणारी स्वप्ने पहिली असल्याचेही त्या सांगतात.

स्वाती महाडिक यांना ९ सप्टेंबर रोजी सैन्यदलातील अधिकारी पद मिळणार आहे. शिल्पकार अभिजित धोंडफळे यांनी संतोष महाडिक यांचा अर्धाकृती पुतळा तयार करून स्वाती महाडिक यांना दिला आहे. तो पुतळा त्यांच्या सातारजवळील पोगरवाडी या गावात बसवण्यात येणार आहे. यावेळी पुण्याचे जॉईंट कमिश्नर ऑफ पोलीस सुनील रामानंद देखील उपस्थित होते.

यावेळी बोलताना रामानंद म्हणाले की आम्हा सर्व देशबांधवांना अशा स्वाती महाडिक सारख्या महिलांवर गर्व आहे.

पती गेल्याचे दुःख उरी न बाळगता त्यांनी लढण्याचा आणि पतीचे स्वप्न आणि तेही सैन्यदलात दाखल होऊन पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याला माझा सलाम असून स्वाती महाडिक यांनी समाजासमोर एक आदर्श घालून दिला आहे. संतोष महाडिक यांचे भाऊ जयवंत महाडिक, तुषार महाडिक तसेच छायाचित्रकार विनायक बोगम आदी यावेळी उपस्थित होते.

# पुण्यात दोन वेगवेगळ्या घटनेत नागरिकांचा चोरट्यांना चोप

**पुणे** : पुण्यात आज शहरातील शिवाजीनगर व फर्ग्युसन रस्त्यावर घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनेत नागरिकांनी चोरट्यांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. यापैकी पीएमटी बसमध्ये महिलांच्या पर्स तसेच दागिने चोरणाऱ्या महिलेला पकडले. मात्र, तिची साथीदाराला फरार होण्यात यश आले. तर फर्ग्यूसन रोडवरील दुसऱ्या एका घटनेत कारमधून बॅग लंपास करणाताना चोरट्याला रंगेहाथ पकडून चांगलाच चोप दिला. दरम्यान, डेक्कन परिसरात घडलेल्या प्रकाराची माहिती देण्यास पोलिसांनी टाळाटाळ केली.

शिवाजीनगर परिसरातील घटनेत सुनिता शाका सकट (३५, रा. गुलबर्गा, कर्नाटक) या पर्स चोर महिलेला अटक करण्यात आली आहे. तर, तिची साथीदार महिला फरार आहे. याप्रकरणी प्रमिला प्रदीप व्यास (३३, रा. मुंबई) यांनी तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रमिला व्यास या मूळच्या मुंबईच्या आहेत. त्या पुण्यात बहिणीकडे आल्या होत्या. शनिवारी दुपारी शिवाजीनगर परिसरातून धानोरीकडे पीएमटीने जात होत्या. त्यावेळी आरोपी सुनिताही त्याच पीएमटीमधून जात होती. त्यावेळी आरोपी सुनिताने प्रमिला व्यास यांची पर्स चोरली. मात्र, प्रमिला व्यास यांना पर्स चोरल्याचे समजले. त्यांनी तात्काळ सुनिताला विचारणा केली. त्यावेळी तिने पर्स फेकून दिली. यानंतर दोघींमध्ये गोंधळ उडाला.

बस थांबवण्यात आली. नागरिकांनीही पर्स चोरून फेकून दिल्याचे पाहिले होते. या गोंधळात आरोपी सुनिता हिची साथीदार गर्दीचा फायदा घेऊन फरार झाली. नागरिकांनी सुनिताला पकडून डेक्कन पोलिसांच्या हवाली केले.

# पाषाण येथे सासरच्या छळास कंटाळून विवाहितेची आत्महत्या



**पुणे (प्रतिनिधी)** : सासरी होत असलेल्या छळास कंटाळून विवाहितेने आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार पुणे शहरातील पाषाण परिसरातून उघडकीस आला. याप्रकरणी विवाहितेच्या पतीला अटक करण्यात आली. ही घटना २२ मार्चला उघडकीस आली.

निकिता चंदन पुरोहित (वय-३०, रा. रेणुका हील्स, फ्लॅट नं.६, सुस रोड, पाषाण, पुणे), असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी तिचा पती चंदन कैलेशचंद्र पुरोहित (वय-२९) याला अटक केली. मयत विवाहितेचे वडील शंभुदत्त बोडा (वय-५६, जोधपूर, राजस्थान) यांनी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याप्रकरणी अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांची मुलगी सासरी नांदत असताना आरोपी चंदन पुरोहित याने तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला. या सर्व प्रकाराला कंटाळून तिने २२ मार्चला राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

# डॉ. आंबेडकरांच्या स्मारकाच्या जमिनीचा ताबा राज्य सरकारकडे!



**मुंबई (प्रतिनिधी)** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी दादर येथील इंदू मिलच्या जमिनीचा ताबा शनिवारी राज्य सरकारकडे देण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय वस्त्रोद्योगमंत्री स्मृती इराणी व सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीमध्ये जमीन हस्तांतरणावर शिक्कामोर्तब करण्यात आले. येत्या काही दिवसांमध्ये या स्मारकाचे काम सुरू करण्यात येईल, अशी माहिती यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पाच वर्षांपूर्वी केंद्रातील व राज्यातील तत्कालीन काँग्रेस आघाडी सरकारने डॉ. आंबेडकरांच्या स्मारकासाठी इंदू मिलची संपूर्ण म्हणजे साडेबारा एकर जमीन देण्याची घोषणा केली. त्यानंतर त्या जमीनीवरील उद्योगाचे आरक्षण उठविण्यापलीकडे सरकारने पुढे फार काही कार्यवाही केली नाही.

त्यानंतर राज्यात व केंद्रातही सत्तांतर झाले. केंद्रातील भाजप सरकारने ही जमीन राज्य सरकारच्या ताब्यात देण्याचा निर्णय घेतला. दोन वर्षांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्मारकाचे भूमिपूजनही केले. परंतु राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडून (एनटीसी) ही जमीन राज्य सरकारच्या ताब्यात देण्यात आली नव्हती.

दरम्यान, राज्यातील युती सरकारने इंदू मिलची संपूर्ण जमीन आंबेडकर स्मारकासाठी आरक्षित करण्याबाबतची कायदेशीर कार्यवाही पूर्ण केली. मात्र जमीन ताब्यात नसल्याने स्मारकाचे प्रत्यक्ष काम सुरु करता येत नाही. मात्र, आता हा प्रश्न मार्गी लागला आहे. इंदू मिलची जागा राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या (एनटीसी) मालकीची आहे. जमिनीच्या मूल्यांकनावरून महाराष्ट्र सरकार व 'एनटीसी'मधील वादामुळे जमीन ताब्यात आलेली नसतानाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील ऑक्टोबरमध्येच स्मारकाचे भूमिपूजन केले होते. या जागेसाठी ३६०० कोटी रुपये मोबदला देण्यासाठी 'एनटीसी' हटून बसले होते.

पण अखेरीस राज्य सरकारच्या १४१३ कोटी ४८ लाख रुपयांच्या मूल्यांकनावर केंद्रीय मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले होते. 'एनटीसी'ला हा मोबदला हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) किंवा तरंगत्या चटईक्षेत्र निर्देशांकातून (फ्लोटिंग एफएसआय) दिला जाणार आहे.

# आरबीआयचे देशभरातील बँकांना मार्च एण्डचे फर्मान

## १ एप्रिलपर्यंत बँकांना सुट्टी न घेता काम करण्याचे आदेश

**नवी दिल्ली** : एक एप्रिलपर्यंत कोणतीही सुट्टी न घेता बँक कर्मचाऱ्यांनी कामकाज सुरु ठेवण्याचे निर्देश आरबीआयने दिले आहेत. हे निर्देश देशभरातील सर्व बँकांना दिले आरबीआयकडून देण्यात आले आहेत. १ एप्रिलपर्यंत शनिवार-रविवारसह सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही बँकांनी कामकाज सुरु ठेवावे असे आरबीआयने आपल्या अधिसूचनेत म्हटले आहे.

सर्व सरकारी बँका आणि काही खासगी बँकांना हे निर्देश देण्यात आले आहेत. ३१ मार्चला २०१६-१७ हे आर्थिक वर्ष संपणार असून एक एप्रिलपासून नव्या आर्थिक वर्षाची सुरुवात होणार आहे. त्यामुळे करभरणा आणि सर्व आर्थिक व्यवहार सुलभ व्हावे या उद्देशाने आरबीआयने हा निर्णय घेतला असल्याचे सांगण्यात येत आहे.

आरबीआयची काही निवडक कार्यालयेसुद्धा १ एप्रिलपर्यंत दररोज सुरु राहणार असल्याचेही सांगण्यात आले आहे.




# बांग्लादेश आणि पाकिस्तान 'सीमा सील करणार'


## राजनाथ सिंह

**भोपाळ** : देशाच्या सुरक्षेमध्ये सीमा सुरक्षा दल अर्थात 'बीएसएफ' आपली जबाबदारी योग्य रितीने पूर्ण करत आहे. यामुळेच देशात लोकांचा 'बीएसएफ'वरील विश्वास वाढला आहे. देशाची सुरक्षा योग्य रितीने व्हावी यासाठी बांग्लादेश आणि पाकिस्तान या आंतरराष्ट्रीय सीमा लवकरात लवकर सील केल्या जातील.

तसेच केंद्र सरकारकडून सीमा सुरक्षा बळकट करण्यासाठी नवीन आराखडा तयार केला जात आहे असे वक्तव्य राजनाथ सिंह यांनी केले आहे. मध्यप्रदेशातील तेकानपूर येथे आयोजित 'बीएसएफ'च्या दीक्षांत समारोह समारंभात ते बोलत होते.

आंतरराष्ट्रीय सीमारेषेवर 'बीएसएफ'ने त्यांच्या काही नियमात बदल केले आहेत. आता शेजरील देशही 'बीएसएफ'चे अस्तित्व जाणतात.

भारतीय लष्करानंतर 'बीएसएफ' हे एकमेव दल असे आहे की जे जल, स्थल आणि वायूदल यांसाठी काम करत आहे.



आम्ही सैन्यदलात तक्रार निवारण यंत्रणा प्रभावीपणे राबवण्याचा विचार करत आहोत असेही राजनाथ सिंह यांनी यावेळी सांगितले.

अनेक 'बीएसएफ' जवानांनी देशाच्या सुरक्षेसाठी त्यांचे जीवन त्यागले आहे.

त्या शहीद जवानांना त्यांनी वंदन केले. तसेच पहिल्या महिला 'बीएसएफ' अधिकारी तनुश्री पारिक या सैन्यात भरती होण्यासाठी प्रशिक्षण घेऊन अकादमी बाहेर पडत आहेत त्यांचेही गृहमंत्र्यांनी कौतुक केले आहे.